**नमुना १ (नियम ४ व ५ पहा)**

**जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर (नगरपालिका शाखा)**

***शिरोळ नगरपरिषद- प्रभाग क्रं. 6-अ पोट निवडणूक***

क्र.कार्या.११/नपा/पोट निवडणूक /आरआर/ ३६५ /क/२०२१
जिल्हाधिकारी कार्यालय,कोल्हापूर.
दि. २५/११/२०२१

## - आदेश -

महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र नगरपालिका व नगरपरिषदा निवडणूक नियम १९६६ मधील तरतुदीनुसार व मा.सचिव,राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांचे कडील पत्र क्र.रानिआ / नप-२०२१प्र.क्र.५/का-६, दि.२४/११/२०२१ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी, जिल्हाधिकारी कोल्हापूर खालीलप्रमाणे परिशिष्ट- १ मध्ये विनिर्दीष्ट करण्यात आलेल्या शिरोळ नगरपरिषदेच्या प्रभाग क्रं.६-अ साठी पोट निवडणूक कार्यक्रम- २०२१ संबंधात पुढील प्रमाणे निवडणूक कार्यक्रम जाहिर करीत आहे.

परिशिष्ट - १

| अ.क्र. | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची/संपविण्याची दिनांक |
|---|---|---|
| १ | अंतिम प्रभागनिहाय मतदार यादया अधिप्रमाणित करून प्रसिध्द करणेचा दिनांक | २६/११/२०२१ (शुक्रवार) |
| २ | जिल्हाधिका-यांनी निवडणूक कार्यक्रम जारी करण्याची तारीख | ३०/११/२०२१ (मंगळवार) |
| ३ | नामनिर्देशनपत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चीत केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरीता उपलब्ध असण्याचा कालावधी | ०१/१२/२०२१ (बुधवार) सकाळी ११.०० ते ०७/१२/२०२१ (मंगळवार) दुपारी ०२.०० पर्यंत |
| ४ | वरील नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | ०१/१२/२०२१ (बुधवार) ते ०७/१२/२०२१ (मंगळवार) (सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० पर्यंत) दि. ०४/१२/२०२१ शनिवार व दि. ०५/१२/२०२१ रविवार या सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत. |
| ५ | नामनिर्देशनपत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | ०८/१२/२०२१ (बुधवार) सकाळी ११.०० वाजल्यापासुन |
| ६ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक अपिल नसेल तेथे | १३/१२/२०२१ (सोमवार) दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| ६-अ | अपिल असल्यास<br>(i) वैधरित्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द झालेल्या तारखेपासून तीन दिवसांच्या आत, जिल्हा न्यायाधिशाकडे अपिल करता येईल<br>(ii) निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अपिलाचा निर्णय लवकरात लवकर प्राप्त करून घेणेसाठी प्रयत्न करावेत. | अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करणेत येईल त्या तारखेनंतर तिस-या दिवशी किंवा तत्पूर्वी. मात्र दिनांक १६/१२/२०२१ (गुरूवार) पर्यत |
| ७ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवारी मागे घेण्यासाठीच्या शेवटच्या दिवसानंतरच्या लगतच्या दिवशी |
| ८ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | २१/१२/२०२१ (मंगळवार) सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत |
| ९ | मतमोजणी व निकाल जाहिर करण्याचा दिनांक | २२/१२/२०२१ (बुधवार) सकाळी १०.०० वाजल्यापासून |
| १० | महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे. | कलम १९ मधील तरतुदीनुसार |

दिनांक — २५/११/२०२१
ठिकाण - कोल्हापूर.




(राहुल रेखावार)
**जिल्हाधिकारी, कोल्हापूर**

**प्रत** - १) उपविभागीय अधिकारी, इचलकरंजी तथा निवडणूक निर्णय अधिकारी.
२) मुख्याधिकारी, शिरोळ न.प. तथा सहा.निवडणूक निर्णय अधिकारी

**प्रत माहितीसाठी**- मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई — ३२